# महा मेट्रो तर्फे ३० मानकऱ्यांचा सन्मान

## मानाचा मुजरा

### आदरणीय समीर उत्तमराव निकम पर्यावरण संवर्धन व इतिहास जतनासाठी समर्पित लढवय्या



समीर उत्तमराव निकम, रहिवासी संगमवाडी, हे गेली वीस-पंचवीस वर्षे पर्यावरण संवर्धन आणि इतिहास संशोधन या दोन्ही क्षेत्रांत सक्रियपणे कार्यरत आहेत. वृक्षसंवर्धनाबाबत शासनाला सातत्याने धारेवर धरुन जागृती निर्माण करणारे आणि संगमवाडी परिसरातील १०० झाडांची तोड थांबवून ती कामे कायमची बंद पाडण्यात यशस्वी ठरलेले ते एक प्रभावी पर्यावरण कार्यकर्ते आहेत. येरवडा भागातील सलीम अली पक्षी अभयारण्य बचाव समितीचे सदस्य म्हणून त्यांनी अनेक पर्यावरणपूरक उपक्रम राबवले आहेत.

इतिहास संशोधनातही त्यांचे योगदान लक्षणीय आहे. संगम पुलाजवळील नदीपात्रात बुडालेला ऐतिहासिक मारुतीचा पुतळा शोधून काढणे, ब्रिटिश रेसिडेन्सी परिसरातील नष्ट होणारी थडगी वाचवण्यासाठी न्यायालयात लढा देणे, चाफेकर बंधूंच्या स्मृतीसाठी बंडगार्डन घाटाला त्यांचे नाव देण्याचा आग्रह धरणे, तसेच अम ळनेर तालुक्यातील ऐतिहासिक दगडी दरवाजा वाचवण्यासाठी पुरातत्व विभागाशी आणि स्थानिक प्रशासनाशी संघर्ष करणे, अशा अनेक ऐतिहासिक वारसा जतनाच्या मोहिमांत त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

विशेष म्हणजे, होळकर पुलाशेजारील होळकर छत्रीवरील अतिक्रमण दूर करण्यासाठी त्यांनी पंधरा वर्षांचा दीर्घ संघर्ष केला, उपोषण आणि आंदोलने केली, आणि अखेरीस ही वास्तू राज्य शासनाच्या संरक्षित स्मारक म्हणून घोषित होण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. लवकरच त्यांचे 'संगमवाडीचा इतिहास' हे पुस्तक प्रकाशित होणार असून, महाराष्ट्रातील सरदार निकम घराण्याच्या दीडशेहून अधिक मोडी कागदांवर आधारित निकम कुलवृत्तांत हे पुस्तकही ते प्रकाशनासाठी सिद्ध करत आहेत.

या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन दैनिक महा मेट्रो तर्फे समीर निकम यांना सन्मानित करण्यात आले आहे.

### आदरणीय श्री. लक्ष्मण किसन काशितकर सामाजिक कार्य, सेवाभाव आणि शौर्याचे प्रतीक



श्री. लक्ष्मण किसन काशितकर, रहिवासी येरवडा गावठाण, यांनी गेली चार दशके जीवनाज्योत मित्र मंडळ, हनुमान मित्र मंडळ सार्वजनिक नवरात्रोत्सव आणि आदर्श मित्र मंडळाच्या माध्यमातून गणेशोत्सव, शिवजयंती, नवरात्रोत्सव यांसारखे सांस्कृतिक उपक्रम राबवतानाच अनेक सामाजिक कार्ये केली आहेत.

महाशिवरात्रीला महादेवाच्या डोंगरावर भाविकांसाठी पाणी वाटप, वारकऱ्यांना दूध, केळी आणि चिवडा वाटप, एक गाव एक होळी उपक्रमाचा प्रारंभ, तसेच लोकांच्या सुख-दुःखात कायम सहभागी राहणे, हे त्यांचे कार्य विशेष ठरते.

२८ जानेवारी १९९८ रोजी येरवडा पुलावरुन पाण्यात पडलेल्या बस दुर्घटनेत, स्वतःच्या जीवाची पर्वा न करता अनेकांचे प्राण वाचवण्याचे धाडस त्यांनी दाखवले, ज्यासाठी त्यांना महानगरपालिकेसह अनेक पुरस्कारांनी गौरवण्यात आले. या घटनेनंतर त्यांना भेटण्यासाठी त्या वेळचे पालकमंत्री, महापौर, आयुक्त आणि मान्यवर ससून रुग्णालयात आले होते. गेली २७ वर्षे पुणे महानगरपालिका शिक्षण मंडळात त्यांनी प्रामाणिक सेवा बजावली आहे.

या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन दैनिक महा मेट्रो तर्फे त्यांना सन्मानित करण्यात आले.

### आदरणीय भारक्त डायग्नोस्टिक्स परवडणाऱ्या दुरात उत्कृष्ट आरोग्यसेवेचे ध्येय

पुण्यातील सर्वात वेगाने प्रगती करणाऱ्या निदान सेवा पुरवठादारांपैकी एक असलेले भारक्त डायग्नोस्टिक्स हे नाव भारत आणि रक्त या शब्दांच्या संगमातून तयार झाले आहे, ज्यातून देशभरातील लोकांना सहज, दर्जेदार आणि परवडणाऱ्या आरोग्यसेवा देण्याची कंपनीची निष्ठा स्पष्ट दिसते. काम भारी, दाम सरकारी या धडाडीच्या घोषवाक्यास अनुसरुन, कंपनी उच्च गुणवत्तेच्या निदान सेवा अत्यंत किफायतशीर दरात पुरवते.

एअरपोर्ट अथॉरिटी ऑफ इंडिया, पुणे यांनी त्यांची कोविड RT-PCR तपासणीसाठी नियुक्ती केली होती आणि त्यानंतरही कंपनीने पुणे कॅन्टोनमेंट रुग्णालयात निदान सेवा सुरूच ठेवल्या आहेत.

अलीकडेच, पुणे महानगरपालिकेसोबतच्या भागीदारीत, राजीव गांधी रुग्णालय येथे उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांच्या हस्ते उद्घाटन झालेले पुण्यातील सर्वांत मोठ्या निदान प्रकल्पांपैकी एक त्यांनी सुरु केला आहे.

परिणामकारकता, सुलभता आणि विस्तार या उद्दिष्टांना केंद्रस्थानी ठेवून भारक्त डायग्नोस्टिक्स सातत्याने वाढत असून, शहरासह परिसरात आपली सेवा अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवत आहे.

या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन दैनिक महा मेट्रो तर्फे त्यांना सन्मानित करण्यात आले.

### आदरणीय श्री. प्रसाद नारायण हसबनीस कर्तव्यनिष्ठेचा अभेद्य प्रवास



श्री. प्रसाद नारायण हसबनीस यांनी मार्च १९८३ मध्ये प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षक म्हणून पोलीस सेवेत प्रवेश करून अखंड ३६ वर्षे लाचलुचपत प्रतिबंध, गुन्हे प्रकटीकरण आणि कायदा-सुव्यवस्था राखण्याच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे.

बृहन मुंबई पोलीस दल, पुणे शहर पोलीस, विशेष शाखा तसेच येरवडा आणि कोंढवा सारख्या संवेदनशील पोलीस ठाण्यांमध्ये त्यांनी यशस्वी कारभार केला. त्यांच्या कार्यकाळात मोठे दरोडे, सोन्याची चोरी, आंतरराष्ट्रीय कार्गो चोटी, आंतरराज्य वाहन चोरी यांसारखे गंभीर गुन्हे उघडकीस आणत अनेक आरोपींना अटक करून मोठ्या प्रमाणात मालमत्ता जप्त करण्यात त्यांनी मोलाची भूमिका बजावली.

कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवताना, जातीय तणावाच्या परिस्थितीत समाजातील सर्व घटकांशी विश्वासाचे संबंध निर्माण करून त्यांनी तणावपूर्ण प्रसंग कुशलतेने हाताळले. लाचलुचपत प्रतिबंध विभागात असताना त्यांनी अनेक यशस्वी सापळे रचून लाचखोरांना रंगेहात पकडले, त्यांच्या सेवाकाळात त्यांना ३१५ बक्षिसे, ३२ प्रशंसापत्रे प्राप्त झाली असून २०११ साली पोलीस महासंचालकांचे सन्मानचिन्ह आणि २०१२ साली राष्ट्रपतींचे पोलीस पदक त्यांना प्रदान करण्यात आले. त्यांच्या संपूर्ण सेवाकाळात एकही शिक्षा न मिळवता त्यांनी आपला अभिलेख उत्कृष्ट ठेवला आहे.

या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन दैनिक महा मेट्रो तर्फे त्यांना सन्मानित करण्यात आले.

### आदरणीय ॲड. दीपक शंकरराव सावंत, बी.एस्सी. एल.एल.बी. सामाजिक कार्य



ॲड. दीपक शंकरराव सावंत, स्वातंत्र्यसैनिक आणि कामगार नेते शंकरराव सावंत यांचे सुपुत्र, यांनी कोल्हापूर येथे शिक्षण घेतले असून बी.एस्सी. व एल.एल.बी. (स्पेशल) पदव्या संपादन केल्या आहेत. कारकीर्दीची सुरुवात मिरज मेडिकल कॉलेजमध्ये लायब्ररी असिस्टंट म्हणून झाली, त्यानंतर कोल्हापूर महानगरपालिकेच्या ऑक्ट्रॉय विभागात क्लार्क म्हणून कार्यरत असताना एल.एस.जी.डी. परीक्षेत संपूर्ण भारतात प्रथम क्रमांक मिळवला. एमपीएससीद्वारे १९८५ मध्ये पोलीस प्रशिक्षण महाविद्यालयात पीएसआय म्हणून निवड होऊन पहिली पोस्टिंग दहिसर पोलीस ठाण्यात झाली. पहिल्याच पोस्टिंगमध्ये मुंबईतील सर्वांत तरुण डिटेक्शन ऑफिसर ठरण्याचा मान त्यांना मि ळाला, जो आजतागायत कोणी मोडलेला नाही.

मुंबईतील १८ वर्षांच्या सेवेत एसपीजी, वाकोला पोलीस ठाणे, टीजनल फॉरेनर रजिस्ट्रेशन ऑफिस, एसबी-२ सीआयडी, विम ानतळ इमिग्रेशन, टराज्य पोलीस नियंत्रण कक्ष अशा विविध ठिकाणी काम करताना अनेक गुन्ह्यांचा यशस्वी तपास करून परदेशी गुन्हेगारांना देशाबाहेर पाठवणे किंवा त्यांच्यावर कारवाई करणे अशी उल्लेखनीय कामगिरी त्यांनी बजावली. १९९२-९३ च्या दंगलीदरम्यान कलिना येथे बीट ऑफिसर म्हणून कार्य करताना दोन महिन्यांच्या अथक प्रयत्नांमुळे एकही सांप्रदायिक घटना घडली नाही.

सातारा जिल्ह्यात डीएसपी मीरा बोरवणकर यांच्या टीडट म्हणून आणि वाई पोलीस ठाण्याचे प्रभारी म्हणून काम करताना संवेदनशील पांडेवाडी दरोडा प्रकरणातील आरोपींना जन्मठेपेची शिक्षा तसेच मालखरेदी करणाऱ्या सोनाटाला १० वर्षांची शिक्षा मिळवून दिली. सीआयडी सांगली येथे कार्यरत असताना मिरज मिड डे मिल घोटाळा, बेदाणा कर्ज फसवणूक यांसारख्या राजकीय दबावाखालील संवेदनशील प्रकरणांचा यशस्वी तपास करून आरोपपत्र दाखल केले. यानंतर मुंबईत पुन्हा बदली होऊन यलो गेट पोलीस ठाण्यात डिझेल घोटाळा उघडकीस आणून दोन जहाजे जप्त केली व नऊ आरोपींवर कारवाई केली.

वार्थी पोलीस ठाण्यात राजकीय दबावाला न जुमानता कायदा-सुव्यवस्था सुरळीत राखली, येरवडा पोलीस ठाण्यात कार्यरत असताना अनेक गंभीर गुन्ह्यांची उकल करून आरोपींना शिक्षा मिळवून दिली, निवृत्तीनंतरही नयाना पुजारी बलात्कार-खून प्रकरणात वैयक्तिक लक्ष ठेवून ३ आरोपींना फाशीची शिक्षा मिळवून दिली, त्यासाठी २१६ दिवस न्यायालयीन उपस्थिती व २८ दिवस जिरह सहन केली. २०१४ साली स्वेच्छा निवृत्ती घेऊन अरुनाई लीगल कन्सल्टन्सी सर्व्हिसेस या माध्यमातून नागरी व फौजदारी वाद, फसवणूक तपास, सायबर गुन्हे, वैवाहिक वाद, वसीयतपत्र, भेटपत्र, करारनामे, तसेच करार विषयक वाद यांचे सल्ला व मार्गदर्शन सुरु केले.

त्यांच्या कठोर परिश्रम, निडर तपासशैली, कायद्यावरील निष्ठा आणि समाजसेवेच्या कार्यामुळे ॲड, दीपक सावंत यांचे नाव पोलिस दल आणि न्यायव्यवस्थेत आदराने घेतले जाते. या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन दैनिक महा मेट्रो तर्फे त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

### आदरणीय श्री. दत्ता पांडू श्रीखंडे, (बी.ए. एम.ए.) व्यसनमुक्तीचे प्रेरणादायी उदाहरण



श्री. दत्ता पांडू श्रीखंडे, मानसशास्त्रात बी.ए. आणि मराठी साहित्यात एम.ए. पदवी प्राप्त असलेले श्री. दत्ता पांडू श्रीखंडे हे गेली ३३ वर्षे व्यसनमुक्त जीवन जगत असून, पुण्यातील मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्रात काउन्सलर व कोऑर्डिनेटर म्हणून कार्यरत आहेत.

मल्टी-ड्रग ॲडिक्शनमधून स्वतःची मुक्तता करून त्यांनी व्यसनमुक्ती क्षेत्रात पथनाट्य, टीव्ही शो, व्याख्याने आणि विविध माध्यमांतून शाळा, महाविद्यालये तसेच इतर ठिकाणी व्यापक जनजागृती केली आहे. त्यांच्या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाचा महात्मा गांधी सेवा पुरस्कार त्यांना मा. नितीन गडकरी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला असून, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मन की बात या कार्यक्रमात त्यांच्या जीवनातील परिवर्तनाचा विशेष उल्लेख केला आहे.

वयाच्या पन्नाशीनंतर त्यांनी बॉडीबिल्डिंग क्षेत्रातही उल्लेखनीय यश संपादन करून पुणे श्री, महाराष्ट्र श्री व भारत श्री या स्पर्धांत सहभाग नोंदवला आहे. सोनी टीव्हीने त्यांच्या जीवनावर विशेष कार्यक्रम सादर केला असून, स्टार प्लसवरील मास्टर शेफ इंडिया सीझन ३ मध्ये ते अंतिम २५ स्पर्धकांमध्ये निवडले गेले होते. आजही ते व्यसनमुक्तीच्या कार्यात तितक्याच जोमाने कार्यरत आहेत.

या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन दैनिक महा मेट्रो तर्फे त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

### आदरणीय ॲड. असुंता पारधे, बी.ए., एल.एल.बी. चेतना महिला विकास केंद्राच्या मुख्य कार्यकारी अधिकारी



ॲड. असुंता पारधे, बी.ए., एल.एल.बी., या गेली बावीस वर्षांपासून सक्रिय सामाजिक कार्यात कार्यरत असून चेतना महिला विकास केंद्राच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत. स्वयंसहायता गटांची निर्मिती, लिंग समानता, चांगले शासन, सांप्रदायिक सलोखा, सामाजिक उद्योजकता, ट्रॉमा केअर, कार्यस्थळी लैंगिक छळ प्रकरणे, कौटुंबिक हिंसा, महिला, बालक आणि ज्येष्ठ नागरिकांच्या हक्कांसाठी कायदेशीर मदत तसेच ग्रामीण व शहरी भागात कायदेविषयक जनजागृती या क्षेत्रांत त्यांना विशेष प्राविण्य आहे. महिलांसाठी सूक्ष्म वित्त योजना राबविणे, लिंग समानतेसाठी व महिलांविरुद्धच्या हिंसाचाराविरुद्ध समुदाय व गावपातळीवरील सहाय्य गट उभारणे आणि विविध कायद्याविषयक प्रशिक्षण देणे यात त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे.

त्या वुमन वेल्फेअर सेंटर, चेतना महिला विकास केंद्र, पुना डायोसिसन सोशल सर्व्हिस सोसायटी, कोकण विकास समन्वय व्यासपीठ आणि इश्वरी सहकारी संस्था यांसारख्या संस्थांच्या संस्थापक सदस्य असून राज्य व राष्ट्रीय स्तरावरील विविध समित्यांमध्ये लैंगिक छळ, कौटुंबिक हिंसा, पीसीपीएनडीटी कायदा आणि एक-स्टॉप सेंटर अशा विषयांवर महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. महिला आणि कायदा, मानवी हक्क, कौटुंबिक हिंसा प्रतिबंध, सूक्ष्म वित्त योजना, युवक व किशोरी विकास, लिंग संवेदनशीलता, चांगले शासन, सांप्रदायिक सलोखा आदी विषयांवर महाराष्ट्र, छत्तीसगड, मध्य प्रदेश या टराज्यांतील पोलिस, वकील, सामाजिक कार्यकर्ते, संरक्षण अधिकारी, विद्यार्थी व स्वयंसेवी संस्था यांना त्यांनी प्रशिक्षण दिले आहे.

त्यांच्या कार्यामध्ये कौटुंबिक हिंसा प्रतिबंध अधिनियम २००५ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी याचिका दाखल करणे, प्रशिक्षणांचे आयोजन करणे, १२५ हून अधिक समुदाय सहाय्य गटांची स्थापना, महिलांसाठी १३०० हून अधिक उद्योजकतेची निर्मिती, पूरपरिस्थितीत मदतकार्य व घरबांधणी प्रकल्प राबविणे, सांप्रदायिक सलोखा प्रस्थापित करण्यासाठी शांतीदूतांचे प्रशिक्षण, मुलींच्या विवाहाचे वय वाढविण्यासाठी व शिक्षणासाठी शिष्यवृत्ती उपलब्ध करणे, बालकांचे पुनर्वसन, दत्तक प्रक्रिया, पीडित मुलांना न्याय मिळवून देणे तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी कायदेशीर मदत व देखभाल सेवा यांचा समावेश आहे.

या सर्व उल्लेखनीय कार्याची दखल घेत महिला व बालविकास विभाग, पुणे महानगरपालिका, कौटुंबिक न्यायालय तसेच विविध संस्थांनी त्यांचा सन्मान केला आहे.

या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन दैनिक महा मेट्रो तर्फे त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

### आदरणीय श्री. सूरज कुलकर्णी, शालाप्रमुख, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यानिकेतन



श्री. सूरज कुलकर्णी, पुणे महानगरपालिकेच्या कर्मवीर भाऊराव पाटील विद्यानिकेतनचे शालाप्रमुख, हे अंकलखोप, सांगलीचे सुपुत्र असून गांधी विचारांचे अभ्यासक व प्रसारक आहेत. संविधानावरील निष्ठा, सर्वधर्मसमभावाची जपणूक आणि विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा देण्यासाठी अखंड प्रयत्नशील राहणे ही त्यांची खासियत आहे.

पालकांच्या अडचणी सोडवण्यासाठी सदैव तत्पर टाहून, शालेय उपक्रमांमध्ये हिरीरीने सहभाग घेत त्यांनी अनेक कार्यक्रम यशस्वी केले. वक्तृत्वकलेची दैवी देणगी लाभलेले, सूत्रसंचालनात निपुण असलेले, तसेच विद्यार्थ्यांमध्ये खेळाची गोडी निर्माण करणारे आणि विविध स्पर्धांमध्ये त्यांना प्रोत्साहित करणारे म्हणून त्यांची ओळख आहे. वाचनाची आवड, मैत्रीतला जिव्हाळा, मित्रांच्या सुखदुःखात सक्रिय सहभाग, रोजगार आणि शिक्षणाच्या संधी मिळवून देण्याची तत्परता तसेच विवाह जुळवून देण्यापर्यंतची मदत हे त्यांचे जिव्हाळ्याचे कार्य आहे. गावाबद्दलची आत्मीयता जपत त्यांनी सांगलीतील नातेवाईक व मित्रमैत्रिणींसाठी सदैव मनापासून योगदान दिले.

पतंगराव कदम कुटुंबीय व भारती विद्यापीठाचा अभिमान बाळगणारे, शाहू-फुले-आंबेडकर विचारधारा आचरणात आणणारे, काँग्रेसविचारांचे कट्टर अनुयायी आणि विविध सामाजिक उपक्रमात योगदान देणारे म्हणून ते सर्वत्र मानले जातात. अमिताभबच्चन यांचे चाहते, क्रिकेटप्रेमी, प्रवासाची आवड असलेले तसेच आई-वडिलांची श्रावणबाळा प्रमाणे सेवा करणारे आणि पत्नी, मुलगा, सुनबाई, नातीवर मनापासून प्रेम करणारे कुटुंबवत्सल व्यक्तिमत्त्व म्हणून ते सर्वांच्या हृदयात घर करून आहेत. ३१ जुलै २०२५ टोजी वयोपरत्वे निवृत्त झाले.

श्री. सूरज कुलकर्णी यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन दैनिक महा मेट्रो तर्फे त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

### आदरणीय सौ. वैशाली भानुदास खांदवे-हुलावळे, गुणवत्ता, निष्ठा आणि सामाजिक बांधिलकीचा प्रवास



सौ. वैशाली भानुदास खांदवे-हुलावळे, M.A B.Ed. पदवीधर, यांनी अखंड ३४ वर्षे शिक्षण क्षेत्रात कार्यरत राहून पुणे शहरातील शिक्षणाचा प्रसार आणि गुणवत्ता वृद्धीसाठी अपूर्व योगदान दिले आहे. सध्या त्या पुणे मनपा विद्यानिकेतन क्रमांक १७, विश्रांतवाडी येथे कार्यरत आहेत.

विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासासाठी त्यांनी सदैव अधिक वेळ देत विविध स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन केले असून त्यांच्या शिस्तप्रियता, जाननिष्ठा आणि विद्यार्थ्यांबद्दलच्या आत्मीयतेमुळे शिष्यवृत्ती, छचचड, मंथन, चढड, हिंदी राष्ट्रभाषा सभा आणि भारती विद्यापीठ अशा विविध परीक्षांत सुमारे ७५ विद्यार्थी गुणवंत ठरले आहेत. शालेय जीवनाचे आकर्षण, ज्ञानार्जनाची ओढ, राष्ट्रप्रेम आणि सांस्कृतिक मूल्य विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यासाठी त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

साक्षरता अभियान, राष्ट्रीय समूहगान, जनगणना, निवडणूक कर्तव्य, इडज कार्य आणि कोविड काळातील जबाबदाऱ्या त्यांनी प्रामाणिकपणे पार पाडल्या आहेत. नाट्यप्रवेश, लोकनृत्य, समूहगान आणि गायन स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांना घडवून त्यांनी अनेक यश मिळवून दिले आहेत. जवाहर नवोदय विद्यालयाच्या स्पर्धेत त्यांनी तयार केलेल्या विद्यार्थ्यपिकी एक विद्यार्थी पुणे जिल्ह्यातील हजार विद्यार्थ्यांमधून निवडला जाऊन उइडए बोडति बारावीपर्यंत मोफत शिक्षण घेऊ शकला. त्यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव दूरचित्रवाणीवरही झाला असून राज्यस्तरीय आणि तालुकास्तरीय प्रशिक्षणांमध्ये त्यांनी तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून योगदान दिले आहे. कोविंड काळात गरजू विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन स्वखर्चाने जीवनावश्यक वस्तू पुरवून त्यांनी सामाजिक बांधिलकीचे उदाहरण घालून दिले आहे.

या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन दैनिक महा मेट्रो तर्फे त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

### आदरणीय श्री. संजय वसंत गायकवाड, विद्यार्थ्यांचा खेळगुरू




श्री. संजय वसंत गायकवाड यांनी S.S.C. आणि D.Ed. शिक्षण घेतल्यानंतर पुणे मनपा शिक्षण मंडळात अखंड ३३ वर्षे शिक्षक म्हणून कार्य केले. गोरगरीब मजुरांच्या मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी त्यांनी घराघरांत जाऊन प्रवेश व उपस्थिती वाढवली आणि शाळा क्रमांक ८६ चौथीवरून सातवीपर्यंत विस्तारली. खेळाविषयी विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण करून सलग २० वर्षे शाळेला पुणे शहरात क्रीडाक्षेत्रात आघाडीवर ठेवले.

क्रीडा अधिकारी देवकर यांच्या सहकायनि क्रीडा निकेतन सुरु करून गरीब पण क्रीडाप्रवीण विद्यार्थ्यांना निवडून पौष्टिक आहार, प्रशिक्षण आणि सर्व सुविधा पुरवल्या. ज्युडो, फेन्सिंग, नेटबॉल, बॅडमिंटन, योगा इत्यादी खेळांत जिल्हा व तालुका पातळीवर अनेक खेळाडू घडवले. वाहतूक सुविधेअभावी स्वतःच्या वाहनाने विद्यार्थ्यांना शाळेत आणण्यापासून स्पर्धामध्ये सहभागी करण्यापर्यंतची जबाबदारी त्यांनी निभावली.

त्यांच्या समर्पित कार्यासाठी यशवंतराव चव्हाण पुरस्कार, गुणवंत शिक्षक गौरव, तसेच मास्टर ट्रेनर म्हणून सलग २० वर्ष योगदानाचा सन्मान मिळाला. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळवून देणे, २५ वर्ष शैक्षणिक सहली व स्टाफ अभ्यासदौरे आयोजित करणे, तसेच मागासवर्गीय शिक्षण संघटनेचे १५ वर्ष अध्यक्षपद भूषवून अनेक शिक्षकांची प्रलंबित प्रकरणे मार्गी लावली.

या उल्लेखनीय सेवाभावी कार्याची दखल घेऊन दैनिक महा मेट्रो तर्फे त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

### आदरणीय श्री. सुदाम कृष्णाजी विश्वे, (ए.टी.डी, ए.एम, बी.ए.एम.ए.) पत्रकारिता, साहित्य आणि कलाक्षेत्रातील अविस्मरणीय प्रवास



श्री. सुदाम कृष्णाजी विश्वे हे ए.टी.डी, ए.एम., बी.ए. (इतिहास) आणि एम.ए. (इतिहास) अशा भक्कम शैक्षणिक पार्श्वभूमीचे, पुणे महानगरपालिकेच्या नेताजी सुभाषचंद्र बोस विद्यालयातील निवृत्त कलाशिक्षक असून त्यांनी ३५ वर्षे सेवा केली आहे. चित्रकला शिक्षक म्हणून कार्यरत असताना विद्यार्थ्यांमध्ये कलेची आवड निर्माण व्हावी यासाठी त्यांनी अनेक उपक्रम राबविले, कला प्रदर्शने, विविध स्पर्धा, शासनाच्या एलिमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षा, सकाळ बालचित्रकला स्पर्धा यांसह इतर अनेक स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी करुन घेत त्यांच्या यशात मोलाचा वाटा उचलला,

२०१८ साली निवृत्तीनंतर त्यांनी लेखन क्षेत्रात पाऊल ठेवले आणि मुलांच्या भावविश्वाशी निगडित तसेच संस्कार घडविणारे लेख, बोधकथा, बालकविता यांचे विपुल लेखन केले. त्यांच्या लेखनाला दै. सकाळ, सप्तरंग, लोकमत, केसटी (छावा), महाराष्ट्र टाइम्स, महा मेट्रो, आधुनिक केसटी, साप्ताहिक भगवे वादळ, मनशक्ती, महाराष्ट्र शिक्षण त्रैमासिक, शिक्षण संक्रमण अशा अनेक वृत्तपत्रे व मासिकांमध्ये स्थान मिळाले, आईची शाळा ही सकाळ सप्तरंगमध्ये प्रकाशित झालेली त्यांची कविता विशेष गाजली. विविध दिवाळी अंकांमध्ये त्यांच्या कथा व कविता प्रकाशित झाल्या असून, पर्यावरणव्रती कुसुम या डॉ. गीताली वि. म. संपादित ग्रंथात त्यांचा लेखही समाविष्ट आहे.

त्यांच्या साहित्यिक योगदानासाठी त्यांना आचिव्हर्स ऑफ पुणे सन्मान, सुंदर हस्ताक्षर स्पर्धेत ज्येष्ठ नागरिक गटात पारितोषिक, वि. ल. शित्रे कथा स्पर्धेतील पुरस्कार तसेच १९९९ साली पुणे मनपा तर्फे आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला आहे. रेखाटन, निसर्गचित्र आणि वाचन यांची त्यांना विशेष आवड असून, आपल्या कलात्मक आणि साहित्यिक कार्यातून त्यांनी समाजात मौल्यवान योगदान दिले आहे.

या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन दैनिक महा मेट्रो तर्फे त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.